


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३९८ बुधवार दि २४ जून २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# मी १०० टक्के निधी खर्च केला! खासदार निधीवरील आरोपांना ओमराजे निंबाळकरांचं सविस्तर उत्तर...

**वृत्तसंस्था-मुंबई**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये काल ठाकरेंच्या सहा खासदारांचा प्रवेश संपन्न झाला. शिंदेंनी राबवलेलं कथित असं ऑपरेशन टायगर यशस्वी झालं. दरम्यान, ठाकरेंची साथ सोडलेल्या खासदारांनी कारणे देताना सांगितलं की, त्यांना लोकांची कामे करण्यासाठी योग्य आणि मोठ्या प्रमाणात निधी मिळत नाही. त्यामुळे लोकांच्या पुढे जायचं कोणत्या तोंडाने. बदलत्या राजकारणानुसार काही निर्णय घ्यावे लागतात, त्यामुळे आम्ही आता शिंदेंच्या शिवसेनेद्वारे पर्यायाने सत्तेच्या मार्गाने मतदारसंघांसाठी मोठा निधी आणू शकू. दरम्यान, काही खासदारांच्या निधींचा आकडा हा माध्यमांमध्ये चर्चेत आला होता. विरोधीपक्षातले खासदार म्हणून प्राप्त झालेला निधी हा संबंधित फुटीर खासदारांनी वापरलाच नसल्याचे समोर आले. त्यामुळे या खासदारांवर टीका वाढली. परंतू आता ओमराजे निंबाळकरांनी त्यांना मिळालेल्या निधीबाबत आणि विकासकामांबाबत स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी माध्यमांशी बातचीत करताना सांगितलं की, किती निधी मिळतो, आणि तो किती कार्यकाळासाठी असतो, खासदार निधी हा ५ वर्षांसाठी असतो, कार्यकाळ संपण्यापूर्वी तो संपवला नाही तर तुम्ही प्रश्न विचारू शकता, असं निंबाळकर म्हणाले आहेत. मी २०१९ ते २०२४ खासदार होतो. या टर्ममधला माझ्या निधीतला एक रुपयाही अखर्चित नाही. सर्व निधी १०० टक्के खर्च झाला. यावर कोणाला शंका असेल तर कोणीही च्या अधिकृत वेबसाईटवरुन माहिती काढू शकता. निधी खर्च करायला पाच वर्ष मिळतात. या टर्ममधील निधीचं मूल्यमापन हे ५ वर्षांनंतर झालं पाहिजे. माझ्या मतदारसंघामधील २१ कामे झाली असंही सांगितलं, पण तुम्ही पाच वर्षांनंतर जर निधी उरला तर सांगा, तर तुम्ही त्याला अपयश म्हणू शकता. मला प्रत्येक वर्षी पाच कोटी निधी मिळतो म्हणजे पाच वर्षाला २५ कोटी खर्च मिळतो. एका बूथला १ लाख जरी म्हटलं तरी एका गावात ५ ते सहा लाख खर्च केला तर उर्वरित बूथवर दुर्लक्ष होतं, कारण एका ठिकाणी खर्च झाला तर उर्वरित ठिकाणी काम कसे करणार. माझा कार्यकाळ संपल्यावर यावर तपासणी करा. मला आता १५ कोटी मिळाले, पण १८ कोटींमध्ये ३ कोटी मागच्या खासदाराने खर्च केले नव्हते ते मला मिळाले. असे मिळून १८ कोटी निधी दिसतो आहे. ४० टक्के विकास निधी





काँग्रेसच्या काळात मिळत असे.पुढे बोलताना ते म्हणाले की, ङ्कविरोधी आमदारांना खर्च मिळत असे. मी २००९ साली आमदार होतो. मी माझा संपूर्ण वेळ हा मतदारसंघाला दिला आहे. आम्ही कामे करत नसू तर तुम्ही आम्हाला बोला ते आम्ही मान्य करु, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत आमच्यासारखे निष्ठावंत कार्यकर्ते काम करतात. धाराशिव मतदारसंघामध्ये आम्ही सातत्याने काम करत होतो, पण तरीही आम्हाला पराभवाचा सामना करावा लागला. आम्ही काम करत असतानादेखील एकही महापालिका आमच्या कार्यकर्त्यांची निवडून येत नाही. सामानय लोकांनी दिलेला कौल सत्तेच्या बाजूने दिला. त्यामुळे पक्षांतराचा निर्णय मी घेतला असे यावेळी ओमराजे निंबाळकरांनी त्यांच्या वक्तव्यात म्हटलं आहे.

# सांगली-साताऱ्यात महायुतीचे तब्बल 100 मतं फुटली...

**वृत्तसंस्था- सातारा**

सांगली-सातारा विधान परिषद निवडणुकीतील महायुतीचे उमेदवार धैर्यशील कदम यांनी ३०१ मतांनी विजय मिळवला. कदम यांना ५९३ मते मिळाली. महाविकास आघाडीचे उमेदवार अभयसिंह जगताप यांनी देखील २९२ मते मिळवत चुरशीची लढत दिली. त्यांनी महायुतीची सुमारे १०० मतं फोडून राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. महायुतीचे उमेदवार धैर्यशील कदम हे भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष होते. त्यांना निवडून आणण्यासाठी भाजपने पूर्ण ताकद लावली होती. सांगली सातारा विधान परिषद निवडणुकीत भाजप ३२५, राष्ट्रवादी (अ. प.) २०५, शिवसेना (शिंदे गट) ११६, राष्ट्रवादी (श. प.) १२०, काँग्रेस ७४, शिवसेना उबाठा १, स्थानिक आघाड्या आणि अपक्ष ५४, असं पक्ष निहाय संख्याबळ होतं. महायुतीच्या मतांचा आकडा ६४६ होता, तर महाविकास आघाडीकडे १९५ मते होती. स्थानिक आघाड्या आणि अपक्षांपैकी बहुतांश मते ही महायुतीच्या गोटातील होती. तरी देखील महाविकास आघाडीचे उमेदवार अभयसिंह जगताप यांनी महायुतीची तब्बल १०० मते फोडल्याचे निकालात स्पष्ट झाले आहे. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीत महायुतीतच संघर्ष झाला होता. त्यानंतर सत्ता स्थापनेवेळी भाजपने नाट्यमय खेळी आणि प्रशासनाला हाताशी धरून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेनेला (शिंदे गट) सत्तेपासून रोखले होते. जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीत मोठा राडा झाला होता. मंत्री शंभूराज देसाई, मकरंद पाटील यांना धक्काबुक्की झाली होती. त्या बदल्याच्या भावनेने दोन्ही नेत्यांनी शेवटपर्यंत ताणून धरत भाजपच्या तोंडचे पाणी पळवले होते. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना बैठक घ्यावी लागली. मतदानाच्या आदल्या दिवशी मंत्री शंभूराज देसाई आणि मंत्री मकरंद पाटील यांचे मन वळविण्यात भाजपला यश आलं. महाविकास आघाडीचे उमेदवार अभयसिंह जगताप यांना महाविकास आघाडीची मते मिळालीच. शिवाय महायुतीच्या नाराज मतदारांना फोडण्यातही त्यांना यश आले. ते ३०० मतांच्या जवळपास पोहोचले. हा भाजपसाठी मोठा धक्का आहे. एकूण ८९५ पैकी ८९४ इतके मतदान झाले होते. झालेल्या मतदानातील ९ मते अवैध ठरली. उर्वरित ८८५ मतांपैकी महायुतीचे उमेदवार धैर्यशील कदम यांना पहिल्या पसंतीची ५९३ मते मिळाली,



तर अभयसिंह जगताप यांना पहिल्या पसंतीची २९२ मिळाली. धैर्यशील कदम हे ३०१ मतांनी विजयी झाले. मागील निवडणुकीत या मतदारसंघातून काँग्रेसचे मोहनराव कदम विजयी झाले होते. या निवडणुकीत महायुतीने या मतदारसंघावर पुन्हा आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे.

# सत्तेच्या दारी सत्तेची तोरणं



विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांमधील निवडणुकीत सत्ताधारी महायुतीला मिळालेले ङ्गशत प्रतिशतफ यश अपेक्षित होतेच. गेल्या वर्षी महापालिका, नगरपालिका आणि मोजक्या जिल्हा परिषदांच्या निवडणुकांमध्ये महायुतीला घवघवीत यश मिळाले; तेव्हाच या मतदारांवर लढल्या जाणाऱ्या विधान परिषदेच्या जागांवरील विजयावरसुद्धा शिक्कामोर्तब झाले होते. एकूण १७ जागांसाठी झालेल्या या निवडणुकीत सर्व जागा महायुतीच्या पदरात पडल्या. त्यामध्ये भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक ११, शिवसेनेने तीन आणि राष्ट्रवादी काँग्रेसने दोन जागांवर विजय मिळवला. नाशकातले बंडखोर उमेदवारही महायुतीच्याच एखाद्या गोटात सहभागी होणार आहेत. अमरावतीमध्ये मात्र काँग्रेसच्या उमेदवाराने शून्य मते मिळवून आगळाच ङ्गविक्रमम केला आहे. सत्ताधाऱ्यांचा वारू या निवडणुकीतही चौखूर उधळला असला, तरी त्यामागील दबावतंत्र, प्रलोभने आणि घोडेबाजाराच्या चर्चा लोकशाहीच्या स्मारकावर आणखी विटा चढवणाऱ्या आहेत, हे मात्र नक्की. ङ्गसगळेच रस्ते रोमकडे जातात,फ या म्हणीनुसार हल्ली सर्वपक्षीय मतदार हे सत्ताधाऱ्यांकडेच येतात, हे वास्तव आहे. त्याच न्यायाला अनुसरून या १७ पैकी सहा जागांवर विरोधी उमेदवारांनी लढण्याआधीच शस्त्रे टाकली होती. ठाणे, कोकण, पुणे, अहिल्यानगर, यवतमाळ आणि वर्धा-गडचिरोली व चंद्रपूर या जागांवर कुठे काँग्रेस तर कुठे ङ्गउबाठाफ गटाच्या उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले. शरद पवार गटाने तर महाविकास आघाडीत भांडून मिळवलेली उमेदवारी शेवटी सत्ताधाऱ्यांच्याच चरणी अर्पण केली. एका उमेदवाराने तर ङ्गघोडेबाजार रोखण्यासाठीफ असा अजब मुलामा लावून आपल्या माघारीचे निलाजरे समर्थनही केले. त्यामुळे उमेदवार किंवा त्यांचे नेते फायद्यात असले, तरी बहुसंख्य मतदारांचा तोटा झाल्याची खंत आणखी सहा वर्षे तरी कायम राहील. अशा पार्श्वभूमीवरील उर्वरीत ११ जागांवरील महायुतीचा विजय, ही औपचारिकताच उरली होती. तेथेही गुप्त मतदानामुळे अनेक मतदारांना ङ्गअंतरात्म्याचा आवाजफ ऐकून सद्सद्विवेकबुद्धीफ वापरण्याची संधी मिळाली. त्यासाठी सत्ताधाऱ्यांकडून योग्य तो ङ्गवरफ मिळाला होताच; त्यामुळेच बहुसंख्य उमेदवार पहिल्याच फेरीत विजयी झाल्यास नवल ते काय! अमरावतीमध्ये भाजपचे प्रवीण पोटे यांच्यासाठी तर अंमळ जास्तच ङ्गप्रसादवाटपफ झाले असावे; त्यामुळेच विरोधी काँग्रेसची ११९ मते असताना त्यांच्या उमेदवाराला भोपळाही फोडण्याची संधी मिळाली नाही. वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारानेही ३१ मते मिळवली, हे लक्षणीय म्हणावे लागेल. एकीकडे ङ्गशिंदेसेनेफच्या ङ्गऑपरेशन टायगरफ ला यश मिळत असताना तेथे मंत्री गिरीश महाजन यांचे चेले गोकुळ गीते यांनी शिंदेसेनेचे उमेदवार नरेंद्र दराडे यांचा पराभव केल्याने महायुतीमधील रस्सीखेच उघड झाली. मात्र, आपल्याच उमेदवाराला धूळ चारणाऱ्या गीते यांना खास विमानाने पाचारण करून शिंदे गटाने घातलेल्या पायघड्या आणि पराभूत उमेदवार दराडे यांनी बड्या नेत्यांची नावे घेऊन आमचेच पैसे वाटून सर्वांनी गद्दारी केली,फ या आरोपाचे पडसादही उमटत राहणार, हे नक्की. काही काळापूर्वीच जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतील नाट्य आणि मंत्र्यांनाही झालेल्या धक्काबुक्कीच्या पार्श्वभूमीवर सातारा-सांगलीमध्ये विजय झाला असला, तरी विरोधी महाविकास आघाडीच्या पारड्यात पडलेली महायुतीची शंभराहून अधिक मते वेगळा संदेश देणारी आहेत.स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विजयाचा गुलाल उधळून महायुतीने आपली पाळेमुळे अधिकच घट्ट केली आहेत. दुसरीकडे विरोधकांना मात्र दिवसेंदिवस भिंग लावून आपले अस्तित्व शोधण्याची वेळ आली आहे, एवढे या निकालाने पुन्हा एकदा दाखवून दिले. लोकांच्या मतांवर निवडून येणाऱ्या विधानसभेच्या आमदारांवर अंकुश ठेवणारे; वेळप्रसंगी त्यांनाही समजुतीचे बोल ऐकवण्याची क्षमता असलेले वरिष्ठांचे सभागृहफ ही विधान परिषदेची ओळख. ग. प्र. प्रधान, ग. दि. माडगूळकर यांच्यापासून ते सत्ताधाऱ्यांना धारेवर धरणारे बी. टी. देशमुख आणि नितीन गडकरी अशा विविध क्षेत्रांतील मान्यवरांची परंपरा लाभलेल्या या सभागृहात बड्या नेत्यांचे कुटुंबकबिले आणि धनाढ्यांचा गोतावळा जमला आहे. त्यातच ङ्गमतदारांची कामे,फ असा मंत्र जपत सगळेच सत्ताधाऱ्यांपुढे नांगी टाकताना दिसत आहेत. अशा वेळी या सभागृहात कोणी कोणाचे कान पिळावेत, असा प्रश्न पडल्यास नवल नाही.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# पहिल्याच दिवशी 97,706 कोटींच्या पुरवणी मागण्या; विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात

■ मुंबई/वृत्तसंस्था

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी 22 जून रोजी सरकारने तब्बल 97,706 कोटींच्या पुरवणी मागण्या पटलावर ठेवल्यात. त्यामुळे राज्याचे आर्थिक नियोजन कोलमडल्याचे समोर येत आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, शेतकरी कर्जमाफिसह विविध योजनांवरील सरकारचा खर्च वाढला. त्यामुळे विधिमंडळासमोर या पुरवणी मागण्या सादर कराव्या लागल्यात.

विधानसभेमध्ये सुरुवातीला माजी उपमुख्यमंत्री अजित पवारांसह इतर दिवंगत नेत्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर तालिका सभापती, अध्यक्षांची नियुक्ती झाली. या नियुक्तीनंतर पटलावर या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने चालू आर्थिक वर्षासाठीच्या पुरवणी मागण्या



आणि विनियोजनाचा सारांश देणारे एक महत्त्वाचे 'स्पष्टीकरणात्मक ज्ञापन' प्रसिद्ध करण्यात आले आहे. यामध्ये महसुली आणि भांडवली अशा दोन्ही खात्यांवर मिळून एकूण 9,77,06,40,39 हजार रुपयांच्या (सुमारे 97,706 कोटी रुपये) प्रस्तावित पुरवणी मागण्यांचा तपशील देण्यात आला आहे. वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आलेल्या या निवेदनानुसार, या पुरवणी मागण्या प्रामुख्याने चार महत्त्वाच्या कारणांसाठी सादर करण्यात आल्या आहेत.

## कर्जमाफीसाठी २० हजार कोटींची पुरवणी मागणी

■ राज्य सरकारने ९७ हजार ७०६ कोटींच्या पुरवणीमध्ये सर्वाधिक २० हजार कोटी रुपयांची मागणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफिसाठी केली आहे. तर स्थानिक स्वराज्य संस्थांतील पायाभूत सुविधांसाठी १५ हजार कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. शेतकरी कर्जमाफिसाठीच्या या पुरवणी मागणीमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

## विधान परिषद तालिका सभापतींची नियुक्ती जाहीर

■ विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला पहिल्या दिवशी विधान परिषदेच्या कामकाजासाठी तालिका सभापतींची नियुक्ती सभापती प्रा. राम शिंदे यांनी जाहीर केली. तालिका सभापती म्हणून सदस्य प्रमोद जठार, कृपाल तुमाने, संजय खोडके, अभिजीत वंजारी, सुनील शिंदे यांची नियुक्ती करण्यात आल्याचे सभापती प्रा. शिंदे यांनी जाहीर केले.

# भाजप 11, शिवसेना 3, राष्ट्रवादी 2 जागा तर एका जागेवर अपक्ष विजयी ; महाविकास आघाडीची पिछेहाट

■ मुंबई/वृत्तसंस्था

## विधान परिषदेत १६ जागांवर महायुतीची बाजी

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषद निवडणुकीत महायुतीचा बोलबाला राहिला. तर महाविकास आघाडीची पिछेहाट पाहायला मिळाली. राज्यातील 17 पैकी 16 जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहेत. तर एका जागेवर अपक्ष आणि भाजप बंडखोराचा विजय झाला. भाजप 11, शिवसेना 3, राष्ट्रवादी कॉंग्रेस 2 आणि अपक्ष 1 असा विधान परिषदेचा निकाल लागला आहे.



विधान परिषदेच्या 17 जागांसाठी 18 जून रोजी निवडणूक पार पडली होती. मात्र या निवडणुकीआधीच 17 पैकी सहा ठिकाणी महायुतीचे उमेदवार बिनविरोध विजयी झाले होते. त्यामुळे 22 जून रोजी उरलेल्या 11 जागांचा निकाल समोर आला. 17 जागांसाठी भाजप 11, शिवसेना 4 आणि राष्ट्रवादी 2 असा महायुतीचा फॉर्म्युला ठरला होता. यापैकी भाजपने 11 पैकी 11 जागा जिंकल्या. राष्ट्रवादी कॉंग्रेसने 2 पैकी 2 जागा जिंकल्या. तर शिवसेनेने 4 पैकी 3 जागा जिंकल्या. नाशिकची जागा महायुतीमधील शिवसेनेला सुटली होती. परंतु गोकुळ गीते यांनी बंडखोरी केली आणि त्याचाच फटका शिवसेनेला बसला. नाशिकमधील शिवसेनेचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांचा अपक्ष आणि भाजपचे बंडखोर उमेदवार गोकुळ गीते यांनी पराभव केला.

विधान परिषदेच्या 17 जागांवर झालेल्या निवडणुकीत सर्वाधिक चर्चेत ठरला तो नाशिक मतदारसंघ. नाशिकमध्ये अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांनी महायुतीचे अधिकृत उमेदवार असलेल्या शिवसेनेच्या नरेंद्र दराडेंना पराभवाची धूळ चारली. महायुतीत नाशिकची जागा शिवसेनेच्या वाट्याला गेली होती. तिथे नरेंद्र दराडेंना उमेदवारी मिळाली. मात्र, तिथे गिरीश महाजन समर्थक आणि भाजपचे नेते गणेश गीते यांच्यासह त्यांचे बंधू गोकुळ गीतेंनी अर्ज भरून बंडखोरी केली. त्यामध्ये गणेश गीतेंनी मुदतीच्या आधीच अर्ज मागे घेतला. मात्र, त्यांचे बंधू गोकुळ गीते यांनी मुदत संपली तरी अर्ज मागे घेतला नाही. या गोकुळ गीतेंची समजूत काढण्यासाठी गिरीश महाजन, उदय सामंत नाशिकमध्ये तळ ठोकून राहिले. चर्चेच्या डझनभरापेक्षा जास्त फेऱ्या झाल्यानंतर मतदानाच्या काही दिवस आधी गोकुळ गीतेंनी प्रचार थांबवत असल्याचे जाहीरही केले. पण अर्ज मागे न घेतल्याने त्यांचे नाव मतपत्रिकेत कायम होते. त्यांनी त्यांची छुपी रणनीती सुरूच ठेवत या निवडणुकीत विजय मिळवला. गोकुळ गीतेंच्या विजयानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांनी गुलाल उधळत एकच जल्लोष केला.

# युएईचे रक्षण करणार भारतीय 'ब्रह्मोस' व 'आकाशतीर'; ऐतिहासिक करार




■ मुंबई/वृत्तसंस्था

भारत सरकार आपली अत्याधुनिक 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्र प्रणाली आणि 'आकाशतीर' ही प्रगत हवाई संरक्षण यंत्रणा संयुक्त अरब अमिरातीला विकण्याच्या अंतिम टप्प्यात आहे. या ऐतिहासिक संरक्षण कराराच्या बातमीने दलाल स्ट्रीटवर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, देशातील प्रमुख सार्वजनिक संरक्षण कंपन्या 'भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड' आणि 'भारत डायनॅमिक्स लिमिटेड' यांच्या शेअर्समध्ये सोमवारी २ टक्क्यांपर्यंतची मोठी तेजी पाहायला मिळाली.

जागतिक पातळीवर वाढत्या भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर, मिडल ईस्ट देशांनी आपली सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यास सुरुवात केली आहे. यूएई भारताकडून 'ब्रह्मोस' क्रूझ क्षेपणास्त्रे आणि भारतीय लष्कराची नवी ओळख बनलेली 'आकाशतीर' हवाई संरक्षण नियंत्रण यंत्रणा खरेदी करण्यासाठी अत्यंत उत्सुक आहे. हा करार पूर्ण झाल्यास, फिलिपिन्स नंतर भारताची ही दुसरी सर्वात मोठी जागतिक संरक्षण निर्यात ठरणार आहे. 'आकाशतीर' प्रकल्प हा भारतीय लष्कराच्या हवाई संरक्षण क्षेत्रातील गेम-चेंजर मानला जातो. हा पूर्णपणे 'स्वदेशी' प्रकल्प असून, कमी उंचीवरील विमाने, ड्रोन आणि शत्रूच्या क्षेपणास्त्रांचा अचूक वेध घेण्यासाठी याचे नियंत्रण नेटवर्क अत्यंत प्रभावी आहे. यूएईला या यंत्रणेची मोठी गरज आहे.

# ब्रिटिश पंतप्रधान स्टार्मर यांचा राजीनामा; 100 हून अधिक खासदार विरोधात होते



■ लंडन/वृत्तसंस्था

ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी सोमवारी पंतप्रधान आणि लेबर पक्षाच्या नेतेपदाचा राजीनामा दिला आहे. 10 डाऊनिंग स्ट्रीट बाहेर राष्ट्राला संबोधित करताना ते म्हणाले की, लेबर पक्षाला असे वाटत नाही की मी पुढील निवडणुकीत नेतृत्व करण्यासाठी योग्य व्यक्ती आहे.

स्टार्मर यांचा राजीनामा अशा वेळी आला आहे, जेव्हा लेबर पक्षाच्या आत त्यांच्या नेतृत्वावरून दीर्घकाळापासून असंतोष वाढत होता. लेबर पक्षाच्या 400 खासदारांपैकी 100 हून अधिक खासदारांनी स्वतःच्याच सरकारविरोधात आघाडी उघडली होती. खासदारांचे म्हणणे होते की, एकतर स्टार्मर यांनी तात्काळ पंतप्रधानपद सोडावे, किंवा ते कोणत्या दिवशी राजीनामा देतील याची तारीख निश्चित करावी. याव्यतिरिक्त, आरोग्य मंत्री वेस स्ट्रीटिंग, संरक्षण मंत्री जॉन हीली आणि आणखी एक मंत्री जेस फिलिप्स यांनी स्टार्मर यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी पद सोडले होते. स्टार्मर हे गेल्या सात वर्षांत कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वी पद सोडणारे पाचवे पंतप्रधान असतील. यापूर्वी थेरेसा मे, बोरिस जॉनसन, लिझ ट्रस आणि ऋषी सुनक यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला होता.

### 17 जुलैपर्यंत ब्रिटनला नवा पंतप्रधान मिळेल

स्टार्मर म्हणाले की, लेबर पार्टी जुलैच्या मध्यापर्यंत आपला नवा नेता निवडेल. नवा नेता आणि पंतप्रधान निवडले जाईपर्यंत ते आपल्या पदावर कायम राहतील. त्यांनी असेही सांगितले की ते आपल्या उत्तराधिकाऱ्याला पूर्ण सहकार्य करतील. स्टार्मर यांनी सांगितले की, त्यांनी सोमवारी सकाळी ब्रिटनचे किंग चार्ल्स तिसरे यांना आपल्या निर्णयाची माहिती दिली. आता लेबर पार्टीची राष्ट्रीय कार्यकारी समिती नवीन नेत्याच्या निवडणुकीचा कार्यक्रम निश्चित करेल. या अंतर्गत 9 जुलैपासून उमेदवारी प्रक्रिया सुरू होईल आणि 17 जुलैपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या उन्हाळी सुट्टीपूर्वी नवीन नेत्याची निवड पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

# “सिया गोयलने 14 जूनलाही केला होता केतनच्या हत्येचा प्रयत्न, नंतर साप आला म्हणून ओरडत मिठीही मारली होती”

**मुंबई/वृत्तसंस्था**

सिया गोयल या तरुणीने तिचा होणारा नवरा केतन अग्रवालला लोहगडावरुन दरीत ढकललं आणि त्याची हत्या केली. या घटनेने पुणे शहरासह संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. सियाने केतन अग्रवाल हा पाय घसरुन दरीत पडला असा बनाव रचला होता. मात्र केतन हा चांगला ट्रेकर होता असं त्याच्या कुटुंबाने सांगितलं आणि सियावर संशय व्यक्त केला. या प्रकरणाचा तपास केल्यानंतर पोलिसांना हे कळलं की सियानेच त्याला धक्का दिला आणि त्याची हत्या केली. या प्रकरणात विविध प्रकारचे खुलासे होत आहेत. सियाने १८ जूनला त्याला धक्का दिला आणि मारलं त्याचा मृतदेह पोलिसांना लोहगडाच्या पश्चिम भागातल्या दरीत आढळून आला. आता अशी माहिती समोर आली आहे की सिया गोयलने १४ जून रोजीही केतनला ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. केतनचे वडील विशाल अग्रवाल यांनीच ही माहिती दिली.





२६ वर्षीय केतन अग्रवाल आणि सिया गोयल यांचं लग्न ठरलं होतं. मात्र केतनची हत्या सियानेच केली. याबाबत केतनचे वडील विशाल अग्रवाल यांनी माहिती दिली. ते म्हणाले १४ जून रोजी सिया केतनला घेऊन लोहगडावर गेली होती. तिथे तिने त्याला धक्का देऊन दरीत ढकलण्याचा प्रयत्न केला. पण केतन झुडुपांमध्ये अडकला आणि वाचला, आपला प्रयत्न फसला आहे हे सियाला लक्षात आलं ज्यानंतर ती लगेच साप आला असं ओरडत केतनच्या जवळ गेली आणि तिने त्याला मिठी मारली. एवढंच नाही तर सिया आणि केतन हे प्री वेडिंग शूटसाठी बाली या ठिकाणी जाणार होते पण जेव्हा ते विमानतळावर गेले तेव्हा लक्षात आलं की केतनचा पासपोर्ट सापडत नाही. हा पासपोर्टही सियानेच चोरला होता. केतनचा पासपोर्ट कुठेतरी पडला असा बनाव सियाने केला. तसंच शोधाशोध करायचं नाटकही केलं. पण तो सापडला नाही त्यामुळे बालीची त्यांची ट्रीप रद्द झाली. त्यानंतर या दोघांमध्ये पुन्हा एकदा वाद झाला आणि तुला माझ्याबरोबर लोहगडावर यावंच लागेल असं सियाने केतनला बजावलं होतं. त्यामुळे केतन तिच्याबरोबर परत लोहगडावर गेला असं विशाल अग्रवाल यांनी सांगितलं. एनडीटीव्हीने हे वृत्त दिलं आहे.

१८ जूनला सिया गोयल आणि केतन अग्रवाल हे दोघंही लोहगडावर फिरायला गेले. लोहगडावरुन सेल्फी घेत असताना केतनचा पाय घसरला आणि तो दरीत पडला अशी माहिती सियाने अग्रवाल कुटुंबाला दिली. त्यानंतर लोणावळा पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली आणि केतनचा शोध घेण्यास सुरुवात केली. त्यावेळी लोहगड किल्ल्याच्या पश्चिम भागात असलेल्या दरीत केतनचा मृतदेह पोलिसांना सापडला. केतनला ट्रेकिंगची आवड होती त्यामुळे तो पडला कसा? याबाबत अग्रवाल कुटुंबाला संशय होता, पोलिसांना ही बाब सांगितल्यानंतर पोलिसांनी हा पैलू लक्षात घेत तपास सुरु केला आणि केतनचा अपघाती मृत्यू नाही तर हत्या झाल्याची बाब समोर आली. सियानेच हा सगळा कट चेतनशी म्हणजेच तिच्या प्रियकराशी संगनमत करुन रचला होता असंही समोर आलं.

पुणे ग्रामीण विभागाचे पोलीस अधीक्षक संदीप सिंग गिल यांनी सांगितलं की केतन अग्रवाल मृत्यू प्रकरणाचे विविध पैलू तपासात समोर आले त्यामुळे आम्हाला हा अपघाती मृत्यू नसून हत्या असल्याचं लक्षात आलं. सिया गोयल आणि चेतन चौधरी यांचे प्रेमसंबंध होते. त्यांच्या प्रेमसंबंधात केतन अडथळा ठरेल म्हणूनच या दोघांनी कट रचून त्याला ठार केलं. फिरायला जाण्याच्या बहाण्याने सियाने केतनला लोहगडावर नेलं. त्या ठिकाणी चेतन चौधरीला सियाने फोन करुन बोलवून घेतलं. यानंतर या दोघांनी केतन अग्रवालला धक्का दिला आणि तो दरीत कोसळला. पोलिसांनी या दोघांनीही अटक केली आहे. न्यायालयाने या दोघांनाही सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# ११ वर्षांच्या मुलीचं अपहरण करुन आधी बलात्कार आणि मग हत्या, दिल्लीतली धक्कादायक घटना; एकाला अटक

**दिल्ली/वृत्तसंस्था**

गुडगाव या ठिकाणी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका ११ वर्षांच्या मुलीचं अपहरण करण्यात आलं. त्यानंतर तिच्यावर बलात्कार करण्यात आला आणि तिची हत्या करण्यात आली. या मुलीचा मृतदेह मेहरुली भागात आढळून आला. पोलिसांनी या प्रकरणी एका संशयिताला अटक केली आहे. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत.




दिल्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सोमवारी सकाळी मेहरोली भागात एका पदपथावर ११ वर्षांच्या मुलीचा मृतदेह आढळून आला. ही मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार आली होती, त्यामुळे पोलीस तिचा शोध घेत होते. पोलिसांना या मुलीचा मृतदेह आढळून आला. या प्रकरणी चौकशी केल्यानंतर या मुलीवर बलात्कार झाल्याचं आणि तिची हत्या झाल्याची बाब समोर आली आहे. या प्रकरणात एका संशयिताला अटक करण्यात आली आहे. तसंच पोलिसांनी या प्रकरणात आणखी कुणी आरोपी आहेत का? हे तपासण्यासाठी पथकंही तयार केली आहेत. या प्रकरणी पुढील तपास सुरु आहे. टाइम्स ऑफ इंडियाने हे वृत्त दिलं आहे.

११ वर्षांच्या ज्या मुलीचा मृत्यू झाला ती मुलगी एका गरीब कुटुंबातली होती. तिचे आई वडील मूळचे बिहारचे आहेत. या मुलीचं कुटुंब मोल मजुरी करुन गुजराण करत होतं अशी माहितीही पोलिसांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ११ वर्षांची ही मुलगी पदपथावर झोपली होती. त्यावेळी बबलू नावाच्या एका कॅब चालकाने तिला उचललं. त्यानंतर तिला टॅक्सी मध्ये घातलं आणि निर्जन स्थळी तिला नेऊन तिच्यावर बलात्कार केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बबलू तिला जिवंत सोडणार होता, तो तिला पुन्हा महारोली भागात घेऊन येत होता. पण त्याला पोलिसांची नाकाबंदी दिसली. त्यामुळे तो घाबरला, त्याने गाडी गुरुग्रामच्या दिशेने वळवली आणि पोलिसांना चकमा दिला. त्यानंतर त्याने महारोलीच्या घनदाट जंगलात या मुलीला नेलं तिथे तिचा गळा दाबून तिची हत्या केली आणि तिचा मृतदेह फेकून तिथून फरार झाला. सदर मुलीचे आई वडील सकाळी जागे झाले. आपली मुलगी दिसत नाही म्हटल्यावर त्यांनी शोधाशोध सुरु केली. पोलिसांनाही त्यांनी मुलगी बेपत्ता झाल्याचं सांगितलं.

# तरुणीवर गुंगीचे औषध देऊन अत्याचार; बळजबरीने गर्भपात

**मुझफ्फरपूर/वृत्तसंस्था**

इन्स्टाग्रामवरून ओळख झालेल्या एका तरुणाने एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला. त्याने वारंवार तिच्यावर बलात्कार केला आणि नंतर तिला मूल पाडण्याकरीता प्रवृत्तदेखील केले, अशी माहिती पोलीसांनी दिलेली आहे. तिने पोलिसांकडे जी तक्रार दाखल केली त्यात तिने या मुलाशी तिचे लग्न लावून देण्यात यावे अशी मागणीदेखील केलेली आहे.

पीडितेच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नसल्यामुळे ती एका मॉलमध्ये काम करत होती, असे पीडितेने सांगितले. इन्स्टाग्रामच्या माध्यमातून तिची या तरुणाशी ओळख झाली होती. तोदेखील त्याच परिसरात एका दुसऱ्या मॉलमध्ये काम करत होता. इन्स्टाग्रामवरील संवादामुळे दोघांमध्ये जवळीक वाढली. पीडितेने आपल्या तक्रारीत नमूद केले आहे की, त्याने तिला वाढदिवसाच्या पार्टीला बोलावले आणि तिथे तिच्या कोल्ड्रिंकमध्ये काहीतरी मिसळले ज्यामुळे तिला गुंगी आली आणि ती बेशुद्ध पडली. ती बेशुद्ध अवस्थेत असताना आरोपी तरुणाने तिच्यावर बलात्कार केला. या घटनेनंतर त्या तरुणाने तिला लग्न करण्याचे आश्वासन देऊन तिला ब्लॅकमेल केले, असेही पीडितेने सांगितले. पुढे ती म्हणाली, “या बलात्काराच्या घटनेनंतर तो तरुण वारंवार मला घरी बोलावू लागला आणि माझे लैंगिक शोषण केले.” या दरम्यान पीडितेच्या पोटात आरोपीचे मूल वाढत होते. असे असतानादेखील आरोपीने तिला अनेकदा बळजबरीने मूल पाडण्यासाठी गोळ्या दिल्या. पीडितेने त्याच्यामागे लग्न करण्यासाठी तगादा लावला, तेव्हा आरोपीने दिलेला शब्द पाळण्यास नकार दिला आणि पीडितेला फसवले. याचबरोबर आरोपी वारंवार तिला त्रास देऊ लागला आणि ब्लॅकमेल करू लागला हे तक्रारीत पीडितेने नमूद केले आहे.

# ‘लंगर’मधील वादातून पेटलेले निहंग शिखांचे आंदोलन अखेर ३ दिवसांनंतर मागे

**नागपूर/वृत्तसंस्था**

उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग येथील गुरुद्वाराच्या छतावर ठाण मांडून बसलेल्या निहंग शिखांचे आंदोलन अखेर तीन दिवसांनंतर मागे घेण्यात आले आहे. पाँटा साहिब येथून आलेल्या शीख समुदायाच्या वरिष्ठ नेत्यांच्या मध्यस्थीनंतर आंदोलकांनी छतावरून खाली उतरण्याचा निर्णय घेतला आणि हा वाद निवळला अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

रुद्रप्रयागचे जिल्हाधिकारी विशाल मिश्रा यांनी मंगळवारी संध्याकाळी सांगितले की, “शीख नेत्यांशी झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर छतावर बसलेले शेवटचे आंदोलकही खाली उतरले. त्यानंतर हे सर्व आंदोलक गुरुद्वारा परिसरातून रवाना झाले आहेत.”

हा संपूर्ण वाद गेल्या शनिवारी (२० जून) सुरू झाला. गुरुद्वारा प्रशासनाशी झालेल्या किरकोळ वादानंतर सात



निहंग शिखांच्या एका गटाने नागरासू गुरुद्वाराच्या छताचा ताबा घेतला होता. कर्णप्रयाग येथे स्थानिक नागरिकांना मारहाण केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या त्यांच्या ४ साथीदारांची सुटका करावी, अशी या आंदोलकांची मागणी होती. आंदोलकांनी छतावरून दगडफेक करत गुरुद्वाराच्या मालमत्तेचे नुकसान केल्याचा आरोपही पोलिसांनी केला आहे. या प्रकरणी आंदोलकांवर कारवाई होणार का? असे विचारले असता जिल्हा दंडाधिकारी मिश्रा म्हणाले, “या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. दोन गटांमधील अंतर्गत वाद असल्याने त्यांच्याच नेत्यांनी मध्यस्थी करून तो सोडवला आहे. हे सर्वजण दोन तासांपूर्वीच निघून गेले आहेत.”

स्थानिक पोलीस अधीक्षक निहारिका तोमर यांनी दिलेल्या माहितीनुसार, पंजाब आणि पाँटा साहिब येथील शिष्टमंडळाने गुरुद्वाराला भेट दिल्यानंतर हा तिढा सुटला. तोमर म्हणाल्या, “आंदोलक खाली उतरताच आम्ही त्यांचे जबाब नोंदवून घेतले आहेत. आता गुरुद्वारा व्यवस्थापनाचेही जबाब घेतले जातील. प्राथमिक माहितीनुसार, लंगरमध्ये (महाप्रसाद) जेवण वाढण्यावरून झालेल्या वादातून ही ठिणगी पडली होती.” सुरुवातीला छतावर ७ जण होते, मात्र मंगळवारपर्यंत त्यातील तिघे निघून गेले होते आणि फक्त ४ जण छतावर उरले होते.

दिल्ली गुरुद्वारा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हरमीत सिंग कालका यांनी सांगितले की, त्यांनी पंजाबमधील या गटाच्या मुख्य प्रमुखांशी चर्चा केली होती. यानंतर कालका यांच्या नेतृत्वाखालील एका शिष्टमंडळाने उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांची भेट घेऊन कर्णप्रयाग येथील कारवाईवर तीव्र आक्षेप घेतला. चमोली पोलिसांनी केलेली कारवाई पूर्णपणे एकतर्फी असून यामुळे शीख समुदायात प्रचंड संताप आहे. दोन पक्षांमध्ये वाद झाला असल्यास दोन्ही बाजू ऐकून घेऊन निष्पक्ष कारवाई व्हायला हवी होती. त्यातच, अटक केलेल्या शीख तरुणांना त्यांच्या डोक्यावर ‘पगडी’ नसतानाच न्यायालयात हजर करण्यात आले आणि त्यांच्याशी गैरवर्तन झाले, असा गंभीर आरोप हरमीत सिंग कालका यांनी केला.

# न्यूझीलंडचा स्कॉटलंडवर विजय; इझी शार्प सामनावीर, हॅलीडेची नाबाद खेळी

**■ ब्रिस्टॉल/वृत्तसंस्था**

आयसीसी महिलांच्या टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत मंगळवारी येथे खेळविण्यात आलेल्या गट 2 मधील सामन्यात न्यूझीलंडने स्कॉटलंडचा 10 चेंडू बाकी ठेवून 6 गड्यांनी पराभव केला. या सामन्यात 43 चेंडूत 62 धावा जमविणाऱ्या न्यूझीलंडच्या इझी शार्पला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. स्कॉटलंडच्या डार्सी कार्टरचे नाबाद अर्धशतक वाया गेले.

या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून स्कॉटलंडला प्रथम फलंदाजी दिली. स्कॉटलंडने 20 षटकांत 7 बाद 131 धावा जमविल्या. त्यानंतर न्यूझीलंडने 18.2 षटकांत 4 बाद 132 धावा जमवित विजय मिळविला. या विजयामुळे न्यूझीलंडला 2 गुण मिळाले. स्कॉटलंडच्या डावात सलामीच्या डार्सी कार्टरने शेवटपर्यंत खेळपट्टीवर राहून 52 चेंडूत 1 षटकार आणि 8 चौकारांसह



नाबाद 72 धावा झळकविल्या. फ्रेजर समवेत तिने सलामीच्या गड्यासाठी 43 चेंडूत 51 धावांची भागिदारी केली. सारा ब्राईसने 22 चेंडूत 3 चौकारांसह 25 तर चटर्जीने 12 चेंडूत 1 चौकारांसह 12 धावा जमविल्या. स्कॉटलंडच्या डावात 1 षटकार आणि 13 चौकार नोंदविले गेले. स्कॉटलंडने पॉवरप्ले दरम्यानच्या 6 षटकांत 45 धावा जमविल्या. 14 षटकाअखेर स्कॉटलंडने 2 बाद 96 धावांपर्यंत मजल मारली होती. कार्टरने 37 चेंडूत 1 षटकार आणि 6 चौकारांसह अर्धशतक पूर्ण केले. न्यूझीलंडतर्फे मेली केरने 17 धावांत 3, सोफी डिव्हाईनने 19 धावांत 2 तर ताहुहू व नेन्सी पटेल यांनी प्रत्येकी 1 गडी बाद केला.

प्रत्युत्तरादाखल खेळताना न्यूझीलंडच्या डावात सलामीची फलंदाज आणि अष्टपैलू मेली केर केवळ 2 धावांवर बाद झाली. त्यानंतर गेझने 17 चेंडूत 2 चौकारांसह 16 धावा जमविल्या. सोफी डिव्हाईन स्लेटरच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत झाली. तिने 1 धावा जमविली. न्यूझीलंडची यावेळी स्थिती 5.1 षटकांत 3 बाद 26 अशी केविलवाणी होती. शार्प आणि हॅलिडे यांनी चौथ्या गड्यासाठी 101 धावांची शतकी भागिदारी करून आपल्या संघाला विजय मिळवून दिला. शार्पने 43 चेंडूत 1 षटकार आणि 8 चौकारांसह 62 तर हॅलिडेने 38 चेंडूत 3 चौकारांसह नाबाद 41 धावा जमविल्या. ग्रीन 4 धावांवर नाबाद राहिली. न्यूझीलंडच्या डावात 1 षटकार आणि 14 चौकार नोंदविले गेले. न्यूझीलंडने पॉवरप्ले दरम्यानच्या 6 षटकांत 31 धावा जमविताना 3 गडी गमविले. शार्पने 38 चेंडूत 7 चौकारांसह अर्धशतक पूर्ण केले. तर शार्प आणि हॅलिडे यांनी शतकी भागिदारी 74 चेंडूत नोंदविली. स्कॉटलंडतर्फे ब्राईस आणि स्लेटर यांनी प्रत्येकी 2 गडी बाद केले.

**संक्षिप्त धावफलक :** स्कॉटलंड 20 षटकांत 7 बाद 131 (कार्टर नाबाद 72, सारा ब्राईस 25, चटर्जी 12, अवांतर 6, मेली केर 3-17, डिव्हाईन 2-19, नेन्सी पटेल व ताहुहू प्रत्येकी 1 बळी), न्यूझीलंड 18.2 षटकांत 4 बाद 132 (इझी शार्प 62, हॅलिडे नाबाद 41, गेझ 16, अवांतर 6, कॅथरिन ब्राईस आणि स्लेटर प्रत्येकी 2 बळी).

## आशियाई महिलांच्या रिले स्पर्धेत भारताला सुवर्णपदक

**■ शाओजिंग (चीन)/वृत्तसंस्था**



येथे झालेल्या आशियाई रिले चॅम्पियनशिपच्या दुसऱ्या आवृत्तीच्या अंतिम दिवशी श्रावणी नंदा, एस.एस.स्नेहा, सुदेश्ना शिवनकर आणि तमन्ना या चौघींच्या भारतीय संघाने महिलांच्या 4×100 मीटरमध्ये 43.85 सेकंदांची वेळ नोंदवत सुवर्णपदक पटकविले. या हंगामातील त्यांची ही सर्वोत्तम कामगिरी आहे.

याशिवाय भारतीय संघाने 4×400 मीटर मिश्र रिलेमध्ये रौप्य आणि मिश्र 4× 100 मीटर रिलेमध्ये कांस्यपदकही पटकावले. मिश्र 4×400 मीटर मिश्र रिले संघाने 3.17.06 सेंकदांचा अवधी घेत रौप्यपदकाची भर घातली. या संघात तीर्थेश शेट्टी, पूवम्मा एम.आर, भरत श्रीधर आणि नीरु पाठक यांचा समावेश होता. भारतीय मिश्र 4×100 मीटर (41.27 सेकंद) रिले संघाने कांस्यपदक जिंकले. या संघात प्रणव गौरव, तमन्ना, अनिमेष कुजुर आणि एस.एस.स्नेहा यांचा समावेश होता.

## व्होंड्रोसोव्हावर बंदी

**लंडन :** झेकची माजी विम्बल्डन विजेती महिला टेनिसपटू मर्केटा व्होंड्रोसोव्हावर 4 वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. सदर घोषणा इंटरनॅशनल टेनिस इंटिग्रेटी एजन्सीने केली आहे. गेल्या डिसेंबरमध्ये व्होंड्रोसोव्हाने उत्तेजक चाचणी देण्यास नकार दर्शविल्याने तिच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाचा निकाल देण्याकरिता स्वतंत्र लवादाची नियुक्ती करण्यात आली होती. 26 वर्षीय व्होंड्रोसोव्हाने 2023 साली विम्बल्डन ग्रँडस्लॅम जिंकताना ट्युनिशियाच्या जेबॉरचा अंतिम सामन्यात पराभव केला होता. विम्बल्डन स्पर्धेच्या इतिहासात महिलांच्या विभागात जेतेपद मिळविणारी व्होंड्रोसोव्हा ही पहिली बिगर मानांकित टेनिसपटू म्हणून ओळखली जाते. मात्र या बंदी कालावधीच्या निर्णयाबद्दल व्होंड्रोसोव्हाकडून अद्याप कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आलेली नाही. टेनिस क्षेत्रामध्ये यापूर्वी हॅलेप, जेनिक सिनर आणि इगा स्वायटेक या तीन टेनिसपटूंवरही कारवाई करण्यात आली होती.

## नेमबाजी स्पर्धेला जसपाल राणा, राजा रणधीर सिंग यांचे नाव

**■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

येत्या जुलै महिन्यात होणाऱ्या इंडिया खुल्या नेमबाजी स्पर्धेचे आता नवे नामकरण करण्यात आले आहे. भारतीय नेमबाजी क्षेत्रातील जागतिक दर्जाचे नेमबाज जसपाल राणा आणि राजा रणधीर सिंग यांचे अलिकडेच निधन झाले होते. आता जुलैमध्ये होणाऱ्या स्पर्धेला जसपाल राणा आणि राजा रणधीर सिंग यांचे नाव देण्यात आले आहे.

सदर घोषणा अखिल भारतीय राष्ट्रीय रायफल संघटनेतर्फे करण्यात आली आहे. भारतीय नेमबाजी आणि क्रीडा क्षेत्रामध्ये जसपाल राणा आणि राजा रणधीर सिंग यांचे योगदान महत्त्वाचे असून देशातील नवोदित नेमबाजांना त्यांची कामगिरी सदैव स्मरणात राहण्याच्या हेतुने हा निर्णय घेण्यात आला



आहे. 27 मे रोजी माजी नेमबाज व प्रशासक रणधीर सिंग याचे वयाच्या 79 व्या वर्षी तर जसपाल राणा यांचे 12 जून रोजी वयाच्या 49 व्या वर्षी निधन झाले होते.

जुलैमध्ये होणारी ही स्पर्धा रायफल आणि पिस्तुल अशा दोन विभागात घेतली जाणार आहे. आता ही स्पर्धा जसपाल राणा स्मृती इंडिया ओपन अशी ओळखली जाईल तर राजा रणधीर सिंग स्मृती इंडिया खुली पिस्तुल नेमबाजी स्पर्धा म्हणून राहील.

## रोहित शर्मासाठी दुग्धशर्करा योग! राष्ट्रपतींच्या हस्ते पद्मश्री पुरस्कार

**■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

'हिटमॅन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रोहित शर्माला क्रीडा क्षेत्रातील त्याच्या अतुलनीय योगदानासाठी अत्यंत प्रतिष्ठेचा 'पद्मश्री' पुरस्कार प्रदान करण्यात आला. आज २३ जून रोजी राष्ट्रपती भवनात आयोजित दिमाखदार सोहळ्यात राष्ट्रपतींच्या हस्ते रोहितला हा सन्मान देऊन रोहितला गौरविण्यात आलं. पद्मश्री पुरस्कार मिळतानाचा हा आजचा दिवस रोहित शर्मासाठी अधिक खास ठरला.

भारताला टी-२० वर्ल्ड कप जिंकवून देणारा कर्णधार आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अनेक ऐतिहासिक विक्रम रचणारा फलंदाज म्हणून रोहित शर्माचं नाव क्रीडा जगतात आदराने घेतलं जातं. हा सर्वोच्च नागरी सन्मान स्वीकारताना रोहितसह त्याच्या कोट्यवधी चाहत्यांनाही तितकाच आनंद होत होता. रोहित शर्मा त्याचा साधा स्वभाव, मिनमिळावूपणा यामुळे चाहत्यांमध्ये फार प्रसिद्ध आहे. रोहितचा हा सन्मान केवळ त्याचा वैयक्तिक गौरव नसून, भारतीय क्रिकेटच्या सुवर्णकाळाचा आणि कोट्यवधी क्रिकेट चाहत्यांचा सन्मान आहे.

रोहित शर्माला आज म्हणजेच २३ जून रोजी पद्मश्री पुरस्कार देण्यात आला. हिटमॅनसाठी हा जणू दुग्धशर्करा योग आहे. कारण आजच्या दिवशीच १९ वर्षांपूर्वी रोहित शर्माने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्ण केलं होतं. रोहितेन २३ जून २००७ मध्ये आयर्लंडमधील बेलफास्ट वनडे सामन्यातून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलं होतं आणि आजच्या दिवशी १९ वर्षांनंतर रोहित शर्माला त्याच्या क्रिकेट कारकिर्दीतील योगदानासाठी भारताचा सर्वोच्च नागरी



पुरस्कार देऊन सन्मानित केलं आहे.

रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघाने आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ आणि आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५चं जेतपद पटकावलं होतं. याशिवाय रोहितच्या नेतृत्त्वाखाली भारताने २०२३ च्या वनडे विश्वचषकात संघाला अंतिम फेरीपर्यंत नेलं होतं. रोहित शर्माने टी-२० आणि कसोटीमधून निवृत्ती घेतली असून तो वनडे क्रिकेटमध्ये अजूनही खेळत आहे. रोहितने १९ वर्षांच्या क्रिकेट कारकिर्दीत तिन्ही फॉरमॅटमध्ये एकूण ५११ सामने खेळले असून त्याच्या नावे एकूण १९,७०२ धावा आहेत. तर ५० शतकं त्याने झळकावली आहे.

रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमध्ये ६७ सामने खेळले असून १२ शतकांसह ४३०१ धावा केल्याआहेत. यामधील त्याची सर्वात मोठी धावसंख्या २१२ आहे. यानंतर वनडे क्रिकेटमध्ये २८५ सामने खेळले असून ३३ शतकांसह एकूण ११,७२० धावा केल्या आहेत. ज्यामध्ये रोहितची सर्वात मोठी वैयक्तिक धावसंख्या २६४ आहे, आजपर्यंत रोहितचा हा वनडेमधील सर्वाधिक धावसंख्येचा विक्रम कोणीही मोडलेला नाही. यानंतर टी-२० क्रिकेटमध्ये रोहितने १५९ सामने खेळले असून ५ शतकांच्या आधारे ४२३१ धावा केल्या आहेत. टी-२० मधील रोहितची सर्वात मोठी धावसंख्या १२१ धावा आहे.

# अनुराग कश्यपने सांगितला आशुतोष गोवारीकरांचा 'लगान'च्या शूटिंगचा 'तो' मजेशीर किस्सा



लगान चित्रपट भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोत्कृष्ट चित्रपटांपैकी एक मानला जातो. या चित्रपटाला प्रदर्शित होऊन २५ वर्षे झाली आहे. आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित आणि आमिर खान अभिनीत व निर्मित या चित्रपटाची आजही तितकीच क्रेझ कायम आहे. यानिमित्ताने कलाकार मंडळी यासंदर्भातील अनेक किस्से सागंत आहेत. अशातच आता दिग्दर्शक अनुराग कश्यपने 'लगान'ला प्रदर्शित होऊन २५ वर्षे झाल्यानिमित्ताने आशुतोष यांचा किस्सा सांगितला आहे.

आमिर खानच्या निर्मिती संस्थेच्या सोशल मीडिया पेजवर शेअर करण्यात आलेल्या व्हिडीओमध्ये अनुराग कश्यप याबद्दल बोलताना दिसत आहे. यावेळी त्याने लगान प्रदर्शित होण्यापूर्वीच इंडस्ट्रीतील अनेकांच्या चर्चेचा विषय ठरला होता. असं म्हटलं आहे. चित्रपटाच्या निर्मितीचा प्रचंड मोठा आवाका आणि त्यासाठी घेतलेली मेहनत आठवत अनुराग कश्यपने दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांचा एक मजेशीर किस्सा सांगितला.

अनुराग कश्यप आशुतोष यांचं कौतुक करत आणि गंमतीत म्हणाला, "चित्रपट पाहण्यापूर्वीच माझ्या लक्षात राहिलेली गोष्ट म्हणजे, आशु (आशुतोष गोवारीकर) कच्छमध्ये चित्रीकरणासाठी गेला होता तेव्हा त्याच्या डोक्यावर केस होते पण, तिथून परतताना त्याचे सगळे केस गळले होते आणि त्याचं टक्कल झालं होतं."

अनुराग कश्यप पुढे म्हणाला की, 'लगान'बद्दल चित्रपटसृष्टीत निर्माण झालेली उत्सुकता मुख्यतः तो ज्या पद्धतीने बनवला जात होता, त्यामुळे होती. तो म्हणाला, "पहिली गोष्ट म्हणजे ते लोक हा चित्रपट ज्या पद्धतीने शूट करत होते. आम्ही ऐकलं होतं की ते 'सिंक साउंड' तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत आणि त्या काळात सिंक साउंड जवळपास वापरातूनच गेले होते. माझ्या मते लगान आणि दिल चाहता है या चित्रपटांपासून त्याचा पुन्हा वापर सुरू झाला."

'सिंक साउंड' म्हणजे चित्रीकरणादरम्यान कलाकारांचे संवाद थेट रेकॉर्ड करणे. त्या काळात बहुतेक हिंदी चित्रपटांमध्ये संवाद नंतर डब केले जायचे, त्यामुळे 'लगान'ने या तंत्राचा वापर केल्याने इंडस्ट्रीत त्याची विशेष चर्चा झाली होती. अनुराग कश्यप पुढे म्हणाला की, त्याच्यासह चित्रपटसृष्टीतील अनेकांवर 'लगान'चा प्रभाव पडला होता. अनुराग कश्यप म्हणाला, "जेव्हा मी 'पांच' बनवत होतो, तेव्हा मीही सिंक साउंडचा वापर करण्याचा निर्धार केला होता. 'लगान'चा चित्रपट बनवण्याचा दृष्टिकोन आणि त्यांची कार्यपद्धती यामुळे या उद्योगात अनेक बदल घडून आले. चित्रीकरणाची शिस्तबद्ध पद्धत, बजेटवर नियंत्रण ठेवण्याची पद्धत आणि एकूणच चित्रपट निर्मितीची प्रक्रिया यामुळे संपूर्ण चित्रपटसृष्टीला खूप काही शिकायला मिळालं".

## अखेर स्टार प्रवाहची 'ही' मालिका संपणार, मुख्य अभिनेत्रीची पोस्ट!

स्टार प्रवाह वाहिनीवर येत्या काही महिन्यांत एकूण ८ नवीन शो सुरू होणार आहेत. त्यामुळे साहजिकच वाहिनीवरील काही जुन्या मालिका प्रेक्षकांचा निरोप घेणार आहेत. आता लवकरच ऑफ एअर होणाऱ्या एका लोकप्रिय मालिकेचं नाव प्रेक्षकांसमोर आलेलं आहे. मालिकेच्या मुख्य नायिकेनेच यासंदर्भात पोस्ट शेअर केली आहे.

'स्टार प्रवाह' वाहिनीवर १४ फेब्रुवारी २०२२ रोजी 'मुरांबा' मालिकेचा पहिला भाग प्रसारित झाला होता. या मालिकेच्या निमित्ताने लोकप्रिय अभिनेता शशांक केतकर आणि अभिनेत्री शिवानी मुंढेकर यांची फ्रेश ऑनस्क्रिन जोडी प्रेक्षकांच्या भेटीला आली. या दोघांनी साकारलेल्या रमा-अक्षयच्या भूमिकांना सर्वांचं भरभरून प्रेम मिळालं. नुकतेच या मालिकेचे १४०० भाग पूर्ण झाले. गेली चार वर्षे ही मालिका रसिक प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवतेय. पण, आता हा चार वर्षांचा प्रवास शेवटाकडे येऊन पोहोचला आहे. सर्वांची लाडकी 'मुरांबा' मालिका लवकरच प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे.

अभिनेत्री शिवानी मुंढेकरने इन्स्टाग्रामवर सेटवरचा मिरर सेल्फी शेअर करत यावर 'One Last Time...रमा म्हणून शेवटचे काही क्षण' असं कॅप्शन लिहिलं आहे. या सेल्फीमध्ये शिवानी रमाच्या लूकमध्ये तयार झाल्याचं पाहायला मिळतंय. यावरून 'मुरांबा' मालिका प्रेक्षकांचा निरोप घेणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. याबाबतच्या पोस्टही सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. जवळपास ४ वर्षे प्रेक्षकांचं मनोरंजन करणाऱ्या या मालिकेला सगळेजण मिस करणार आहेत. खरंतर, ही मालिका पहिल्या दिवसापासून दुपारच्या सत्रातच प्रसारित करण्यात आली होती. ही 'प्रवाह दुपार' मधील सर्वात यशस्वी मालिका आहे. 'लग्नानंतर होईलच प्रेम' मालिकेची वेळ बदलल्यामुळे सध्या 'मुरांबा' दुपारी ३ वाजता ऑन एअर होतेय, आणि आता लवकरच ही मालिका संपणार आहे. प्रेक्षकांना शशांक-शिवानीसह निशाणी बोरुले, सुलेखा तळवलकर, अभिजीत चव्हाण, प्रतिमा कुलकर्णी, काजल काटे, मीरा सारंग, आरंभी उबाळे, सिद्धार्थ खिरीड अशा लोकप्रिय कलाकारांची मांदियाळी पाहायला मिळाली आहे.

## त्रिशा कृष्णनने केली विजय यांच्यासाठी पोस्ट, ५ केक अन् रोमॅंटिक लूक, कॅप्शनने वेधले लक्ष



तमिळनाडूचे मुख्यमंत्री आणि लोकप्रिय अभिनेते थलपती विजय यांच्या वाढदिवशी दाक्षिणात्य अभिनेत्री त्रिशा कृष्णनने पोस्ट न केल्यामुळे चाहत्यांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली होती. अखेर वाढदिवसाच्या दुसऱ्या दिवशी त्रिशाने इन्स्टाग्रामवर पोस्ट केली आहे. पाच केकबरोबरचा विजय जोसेफ यांचा फोटो शेअर करून त्रिशाने खास कॅप्शन लिहिलं आहे.

त्रिशा कृष्णनने विजय यांना इन्स्टाग्रामवर अनफॉलो केल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. अशातच २२ जून रोजी विजय यांचा वाढदिवस होता, दरवर्षी त्यांच्या वाढदिवशी न चुकता पोस्ट करणाऱ्या त्रिशाने दुसरा दिवस संपत आला तरीही पोस्ट न केल्याने यांच्यात नेमकं बिनसलंय की काय अशा चर्चा सुरू होत्या. याचदरम्यान त्रिशाने विजय यांच्या वाढदिवसाची पोस्ट केली आहे. ही पोस्ट सध्या सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल होत आहे.

"ज्याच्यामुळे प्रत्येक गोष्टीला अर्थ आहे, अशा व्यक्तीला वाढदिवसाच्या शुभेच्छा," असं कॅप्शन लिहून त्रिशाने मुख्यमंत्री विजय यांचा फोटो पोस्ट केला आहे. या फोटोत त्रिशा प्रेमाने विजयकडे बघताना दिसतेय. तसेच टेबलवर एक-दोन नव्हे तर ५ केक आहेत.

त्रिशा कृष्णनने ही पोस्ट करताच त्यावर चाहत्यांनी लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव केला आहे. त्रिशाची ही पोस्ट मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आहे. अनेकांनी या पोस्टवर कमेंट करून विजय यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. तर काहींनी सर्व अफवांना पूर्णविराम देत त्रिशाने अखेर पोस्ट केली, अशा कमेंट्सही केल्या आहेत. दरम्यान, त्रिशा कृष्णन व थलपती विजय यांच्या अफेअरच्या चर्चा मागील काही महिन्यांपासून होत आहेत. विजय यांची पत्नी संगीता सोर्नालिंगमने त्यांचं अभिनेत्रीशी अफेअर असल्याचा आरोप करत घटस्फोट मागितला होता.

त्यानंतर त्रिशा व विजय ट्विनिंग करत एका रिसेप्शन सोहळ्याला पोहोचले होते. तेव्हापासून या दोघांच्या नात्याबद्दल तर्कवितर्क लावले जात आहेत. तसेच त्रिशाच्या वाढदिवशीच तमिळनाडू विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. विजय यांच्या टीव्हीके पक्षाने निवडणूक जिंकल्यावर त्रिशा थेट त्यांच्या घरी गेली होती. इतकंच नाही तर विजय यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली तेव्हाही तिने हजेरी लावली होती.

# प्रकाश राज यांच्या अडचणीत वाढ; बंगळुरू न्यायालयाकडून अजामीनपात्र वॉरंट जारी, कोणत्याही क्षणी अटकेची शक्यता!



आपल्या परखड भूमिका आणि विधानांमुळे नेहमीच चर्चेत राहणारे दाक्षिणात्य आणि बॉलिवूडचे प्रसिद्ध अभिनेते प्रकाश राज यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. बंगळुरु येथील एका न्यायालयाने त्यांच्याविरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. एकापेक्षा जास्त मतदार ओळखपत्रे बाळगल्याच्या आरोपाप्रकरणी हे वॉरंट काढण्यात आले असून, यामुळे प्रकाश राज यांना कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. न्यायालयाने वारंवार समन्स बजावूनही प्रकाश राज न्यायालयात हजर राहिले नाहीत. अखेर कोर्टाने त्यांच्यावर ही कडक कारवाई केली आहे.

बंगळुरु येथील ४८ व्या अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी (ACJM) न्यायालयाने हे अजामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. प्रकाश राज यांनी न्यायालयीन आदेशांकडे वारंवार दुर्लक्ष केल्याचे कोर्टाने आपल्या आदेशात नमूद केले आहे. हे संपूर्ण प्रकरण २०१९ मधील आहे. वकील दिलीप कुमार यांनी बेंगळुरू येथील हलासुरू गेट पोलीस ठाण्यात प्रकाश राज यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. भारतीय निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार, कोणत्याही भारतीय नागरिकाला देशभरात केवळ एकाच ठिकाणी मतदार यादीत नोंदणी करता येते. एकापेक्षा जास्त ठिकाणी मतदार ओळखपत्र असणे हा कायद्याने गुन्हा आहे. तक्रारीनुसार, प्रकाश राज यांनी कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा अशा चार वेगवेगळ्या राज्यांमध्ये मतदार म्हणून नोंदणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. दुसरीकडे, प्रकाश राज यांनी भूतकाळात हे सर्व आरोप फेटाळून लावले होते. "माझी मतदार नोंदणी केवळ तामिळनाडूमध्येच असून मी तिथूनच मतदान करतो," असे त्यांनी स्पष्ट केले होते. आता कोर्टाने वॉरंट जारी केल्यानंतर प्रकाश राज यांचे वकील या वॉरंटला स्थगिती मिळवण्यासाठी किंवा तातडीने जामीन मिळवण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेण्याची शक्यता आहे. प्रकाश राज हे गेल्या काही दिवसांपासून 'धर्मस्थळ' वादामुळे आधीच चर्चेत आहेत. धर्मस्थळ या तीर्थक्षेत्राची जाणीवपूर्वक बदनामी करण्यासाठी एक मोठे कारस्थान रचले गेले, असा दावा करणाऱ्या एका रिट याचिकेत प्रकाश राज यांच्या नावाचा उल्लेख करण्यात आला आहे.

या वादावर स्पष्टीकरण देताना प्रकाश राज यांनी काही दिवसांपूर्वीच पत्रकार परिषद घेतली होती. "मला एका सहकाऱ्याकडून काही माहिती मिळाली होती, जी मी एक जबाबदार नागरिक म्हणून तत्परतेने 'एसआयटी' (SIT) प्रमुखांकडे सुपूर्द केली. माझे कर्तव्य तिथेच संपले," असे त्यांनी म्हटले होते. मात्र, हा वाद ताजा असतानाच आता मतदार ओळखपत्र प्रकरणात त्यांच्यावर अटकेची टांगती तलवार निर्माण झाली आहे. प्रकाश राज हे भारतीय चित्रपटसृष्टीतील एक दिग्गज नाव आहे. नुकतेच ते 'कालिदास-२' आणि 'सीता पयानम' या चित्रपटांमध्ये दिसले होते. आगामी काळात ते अजय देवगणच्या बहुप्रतिक्षित 'दृश्यम ३' या हिंदी चित्रपटासह 'स्पिरिट' आणि 'वाराणसी' यांसारख्या मोठ्या बजेटच्या दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. मात्र, या कायदेशीर कटकटींमुळे त्यांच्या अडचणीत भर पडली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांना ऑनलाइन प्रशिक्षण

जनसंचलन/बुलढाणा

भारत निवडणूक आयोगाने मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण ( - ) कार्यक्रमाची घोषणा केली आहे. या मोहिमेअंतर्गत मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी नव्याने पात्र ठरणाऱ्या मतदारांचा समावेश, स्थलांतरित व मयत मतदारांची नोंद अद्ययावत करणे तसेच प्रत्येक मतदाराची माहिती पडताळून पाहण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यानुसार २० जून ते २९ जून २०२६ या कालावधीत तयारी, प्रशिक्षण तसेच छपाईची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने पी. एम. साने () यांच्या मार्गदर्शनाखाली बुलढाणा जिल्ह्यात कामकाजासाठी नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथील जिजाऊ सभागृहात व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) तसेच निवडणूक प्रक्रियेशी संबंधित महत्त्वाचे अधिकारी ऑनलाइन सहभागी झाले होते. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी सुधिर खांदे, उपजिल्हाधिकारी अजिंक्य घोडके, उपविभागीय अधिकारी सुहासिनी गोनेवार, उपविभागीय अधिकारी जयश्री ठाकरे, तहसीलदार वृशाली केसकर, तहसीलदार संजीवनी मुपडे आदी उपस्थित होते. या प्रशिक्षणामध्ये मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण प्रभावीपणे पार पाडण्यासाठी बीएलओ यांनी नवीन मतदार, स्थलांतरित मतदार तसेच मयत मतदार यांचे अर्ज कशाप्रकारे भरून घ्यावेत, त्यांची अचूक नोंद कशी करावी आणि पडताळणी प्रक्रिया कशाप्रकारे राबवावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेदरम्यान प्रत्येक पात्र मतदाराचा समावेश होईल आणि मतदार यादी अद्ययावत व त्रुटीमुक्त राहील, यासाठी काटेकोरपणे काम करण्याच्या सूचना पी. एम. साने () यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या.

# ३० जूनपर्यंत वार्षिक विवरणपत्र दाखल करा; अन्यथा 10 हजारांचा दंड



जनसंचलन/बुलढाणा

प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ अंतर्गत नोंदणीकृत सर्व नियतकालिकांच्या प्रकाशकांनी आर्थिक वर्ष २०२४-२५ चे लेखापरीक्षित वार्षिक विवरणपत्र ( ) ३० जून २०२६ पर्यंत प्रेस सेवा पोर्टल () वर ऑनलाइन सादर करावे, असे आवाहन भारत सरकारच्या प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी केले आहे. प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ मधील कलम १४(१)(ब) आणि १४(३) नुसार प्रत्येक नोंदणीकृत नियतकालिकासाठी वार्षिक विवरणपत्र दाखल करणे बंधनकारक आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ चे विवरणपत्र अद्याप सादर न केलेल्या प्रकाशकांना ३० जून २०२६ पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली असून, यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. निर्धारित मुदतीत वार्षिक विवरणपत्र सादर न केल्यास संबंधित प्रकाशकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. पहिल्या उल्लंघनासाठी किमान १० हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. त्यानंतरच्या प्रत्येक उल्लंघनासाठी दंडाची रक्कम मागील दंडाच्या दुप्पट असेल. मात्र, एकूण दंडाची कमाल मर्यादा दोन लाख रुपये निश्चित करण्यात आली आहे. म्हणून आर्थिक वर्ष २०२४-२५ चे वार्षिक विवरणपत्र अद्याप दाखल न केलेल्या प्रकाशकांनी ३० जूनपूर्वी प्रेस सेवा पोर्टलवर ऑनलाइन विवरणपत्र सादर करून दंडात्मक कारवाई टाळावी, असे आवाहन प्रेस रजिस्टर जनरल यांनी केले आहे.

# कसं काय मोहिमेअंतर्गत जिल्हाभर आरोग्य जनजागृती जोहर नगर येथे गरोदर माता तपासणी शिबिर

जनसंचलन/बुलढाणा

राज्य शासनाच्या ङ्गमाझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या कसं काय मोहिमेच्या माध्यमातून जिल्ह्यात सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा () अधिक सक्षम करण्यासाठी विविध प्रशिक्षण, जनजागृती उपक्रम आणि आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील विविध आरोग्य संस्थांमध्ये हा उपक्रम राबविला जात असून, त्याचाच एक भाग म्हणून सोमवारी (दि. २२ जून) नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, जोहर नगर येथे गरोदर माता तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. शिबिरात गरोदर मातांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच सिकलसेल आजाराबाबत जनजागृती, तपासणी आणि समुपदेशन करण्यात आले. उपस्थित महिलांना सिकलसेल आजाराचे स्वरूप, लक्षणे, आनुवंशिकता, प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच वेळेवर निदान व उपचाराचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी माता व बाल आरोग्य संवर्धनासाठी नियमित तपासणी, संतुलित पोषण, लसीकरण आणि आरोग्यदायी जीवनशैलीचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले. कसं कायफ मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, आयुष्मान आरोग्य मंदिरे, उपकेंद्रे आणि नागरी आरोग्य केंद्रांमध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण सत्रे, सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवेची प्रात्यक्षिके, रोगप्रतिबंधक जनजागृती उपक्रम तसेच विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन सुरू असून नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. या उपक्रमात वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आशा स्वयंसेविका तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, जोहर नगर येथील कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. त्यांच्या सहकार्यामुळे शिबिर यशस्वीरीत्या पार पडल्याचे आरोग्य विभागाने कळविले आहे.

# बुलढाणा जिल्ह्यात २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम

जनसंचलन/बुलढाणा

पोलिओमुक्त भारताचा दर्जा कायम राखण्यासाठी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील २ लाख ३० हजार ४०१ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यात येणार आहेत. या मोहिमेसाठी आरोग्य विभागाने व्यापक नियोजन केले असून जिल्हाभरातील सर्व यंत्रणा सज्ज करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक बालकापर्यंत पोहोचण्यासाठी सुमारे २ हजार ६९ लसीकरण बूथ उभारण्यात येणार आहेत. मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ६ हजारांहून अधिक अधिकारी, कर्मचारी, आशा स्वयंसेविका आणि स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे. बूथवरील लसीकरणानंतर वंचित राहिलेल्या बालकांना घरभेटीद्वारे पोलिओ डोस देण्यात येणार असून शहरी भागात पाच दिवस आणि ग्रामीण भागात तीन दिवस विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी सांगितले की, पोलिओ हा कायमस्वरूपी अपंगत्व निर्माण करणारा गंभीर आजार आहे. त्यामुळे ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओचे दोन थेंब देणे अत्यंत आवश्यक आहे. सर्व पालकांनी आपल्या पाल्यांना जवळच्या पोलिओ बूथवर घेऊन जाऊन लसीकरण करून घ्यावे.फ्र माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, ङ्गनियमित लसीकरण झालेल्या बालकांनाही पल्स पोलिओचे दोन थेंब देणे आवश्यक आहे. कोणतेही बालक लसीकरणापासून वंचित राहू



नये यासाठी सर्वांनी सहकार्य करावे.फ्र या मोहिमेत बसस्थानके, रेल्वे स्थानके, वीटभट्ट्या, बांधकामस्थळे तसेच स्थलांतरित व भटक्या कुटुंबांच्या वस्त्यांमधील बालकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. विविध विभागांच्या समन्वयातून जनजागृती उपक्रमही राबविण्यात येत आहेत. दोन थेंब जीवनाचेफ्र या संदेशासह जिल्ह्यातील सर्व पालकांनी २८ जून रोजी आपल्या ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओचे दोन थेंब अवश्य पाजावेत, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# विराज प्रोफाईल्स कंपनीतील कथित मानसिक छळाला कंटाळून इंजिनियरची आत्महत्या....

## जातिवाचक शिवीगाळ, धमक्या आणि ब्लॅकमेलिंगमुळे प्रदीप जाधवांनी संपवली जीवनयात्रा..

**जनसंचलन-बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यातील रहिवासी तसेच बोईसर येथील नामांकित विराज प्रोफाईल्स स्टेनलेस स्टील कंपनीत उच्च पदावर कार्यरत असलेले प्रदीप सुखदेव जाधव यांनी कंपनीतील कथित मानसिक छळ आणि त्रासाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणामुळे औद्योगिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून जाधव कुटुंबीयांनी कंपनीच्या मालकासह नऊ जणांविरोधात कठोर कारवाईची मागणी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रदीप जाधव हे गेल्या सात वर्षांपासून बोईसर येथील विराज प्रोफाईल्स कंपनीमध्ये एक्झिक्युटिव्ह इंजिनियर पदावर कार्यरत होते. मात्र कंपनीचे मालक नीरज कोच्चर, सीईओ जितेंद्र प्रताप गर्ग यांच्यासह काही वरिष्ठांकडून त्यांना सातत्याने मानसिक त्रास दिला जात होता, असा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे. जातिवाचक शिवीगाळ, अपमानास्पद वागणूक तसेच जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. १९ जून रोजी प्रदीप जाधव यांना कंपनी मालकाच्या बंगल्यावर बोलावण्यात आले होते. त्या ठिकाणी सीईओसह एकूण नऊ जण उपस्थित होते. बैठकीदरम्यान प्रदीप जाधव यांच्यावर खोटे आरोप करून त्यांना प्रचंड मानसिक त्रास देण्यात आला. ब्लॅकमेल करण्याचाही प्रयत्न झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या बैठकीनंतर प्रदीप जाधव थेट आपल्या फ्लॅटवर गेले आणि त्यांनी आत्महत्या करण्यापूर्वी सुसाईड नोट लिहून ठेवली. त्या नोटमध्ये कंपनीतील अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या कथित त्रासाचा उल्लेख करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. यानंतर त्यांनी गळफास घेऊन जीवन संपविले. या घटनेनंतर बोईसर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत सुसाईड नोट जप्त केली आहे. पत्नी वंदना प्रदीप जाधव यांनी दिलेल्या तक्रारीवरून बीएनएसच्या कलम १०८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, प्रदीप जाधव यांच्या पत्नी वंदना जाधव आणि मुलगा यश जाधव यांनी आरोपींवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून तातडीने अटक करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देण्यात आले आहे. तसेच राज्यात सुरू असलेल्या विधानसभा अधिवेशनात या प्रकरणाची चर्चा करून जाधव कुटुंबाला न्याय द्यावा, तसेच खासगी कंपन्यांमध्ये अधिकारी व कामगारांवर होणाऱ्या कथित मानसिक छळाविरोधात सरकारने कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी बुलढाणा जिल्ह्यातून




होत आहे. आता बोईसर पोलीस पोस्टमार्टम अहवाल आणि सुसाईड नोटच्या आधारे विराज प्रोफाईल्स कंपनीच्या मालकासह संबंधित नऊ जणांवर कोणती कारवाई करतात, याकडे संपूर्ण बुलढाणा जिल्ह्याचे लक्ष लागले आहे...

# मयतांच्या नावावर रेशनची लूट? मेहकरमध्ये मोठ्या घोटाळ्याचा आरोप!

**जनसंचलन/मेहकर**

मेहकर तालुक्यातील सार्वजनिक वितरण प्रणाली (रेशन व्यवस्था) मध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते तथा जिल्हाध्यक्ष गोपाल सुभाषराव आखाडे यांनी उपविभागीय महसूल अधिकारी, व तहसीलदार मेहकर यांच्याकडे निवेदन सादर करून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. निवेदनानुसार, तालुक्यातील अनेक गावांमध्ये अनेक वर्षांपूर्वी मृत्यू झालेल्या व्यक्तींची नावे आजही रेशन कार्डवर कायम आहेत. विशेष म्हणजे, अशा मृत व्यक्तींच्या नावावर नियमितपणे रेशन धान्य उचलले जात असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. त्यामुळे शासनाच्या धान्याचा मोठ्या प्रमाणात अपहार होत असून खऱ्या व पात्र लाभार्थ्यांना त्याचा फटका बसत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आराखडे यांनी म्हटले आहे की, जर हे आरोप खरे ठरले तर हा केवळ धान्य वितरणातील गैरव्यवहार नसून शासनाच्या योजनांवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा प्रकार आहे. संबंधित रेशन दुकानदार, पुरवठा विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या संगनमतातून हा प्रकार सुरू असल्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही त्यांनी सूचित केले आहे. याशिवाय, मेहकर तालुक्यातील सर्व रेशन कार्डांची विशेष तपासणी करण्यात यावी, मृत व्यक्तींची नावे तात्काळ वगळण्यात यावीत आणि त्यांच्या नावावर धान्य उचलल्याच्या प्रकरणांची स्वतंत्र चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# समृद्धीवरील अपघातात डॉक्टर पती-पत्नीचा मृत्यू मुलगा व मुलगी व चालक गंभीर जखमी.

## समोर चालत्या ट्रकला भरधाव फोरचुनर ची धडक पती-पत्नी ठार

**जनसंचलन-बुलढाणा**

समृद्धी महामार्गाच्या मुंबई कॉरिडोर वर चॅनल क्रमांक ३२६ .५ या ठिकाणी २३ जून च्या सकाळी सहा वाजता दरम्यान अपघात होऊन चालत्या ट्रकच्या पाठीमागून फोरचुनर कारणे धडक दिली यामध्ये संभाजीनगर येथे राहणारे डॉक्टर सय्यद आसिफ व त्यांची पत्नी यांचा मृत्यू झाला तर त्यांची मुलगा व मुलगी दोन्ही गंभीर जखमी झाले सोबतच कार्ड चालत सुद्धा जखमी झाल्याची घटना घडली.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार २३ जून च्या सकाळी सहा वाजता दरम्यान चॅनल क्रमांक ३२६.५ मुंबई कॉरिडॉर वर अपघात झाला अशी माहिती मिळताच पो नि सोळंके,आराख,राठोड, चौधरी,दंगू,शेनासिर,बारगजे पोहेका हे घटनास्थळी पोहोचले असता ट्रक क्रमांक ०१ ४९८१ व फोरचुनर कार क्रमांक एम हेच २० एच एन ६७६८ चा अपघात होऊन मिडल लेनवर अपघातग्रस्त उभे दिसले. ट्रक चालक मोहम्मद इजराऊल हक राहणार झारखंड यास त्यांनी विचारपूस केले असता त्याने सांगितले की तो ट्रक घेऊन नागपूर वरून मुंबईकडे जात असताना पाठीमागून येणाऱ्या फॉर्च्यूनर कार क्रमांक एम हेच २० एच एन ६७ ६८ च्या चालकाने सदरील ट्रकला पाठीमागून जबर धडक दिली म्हणून अपघात झाला. सदर अपघातात कार मधील डॉक्टर सय्यद असिफ सय्यद उमर वय ५२ वर्ष, गुलसितान बी सय्यद असिफ वय ४५ वर्ष यांना गंभीर मार लागून जागेवर मरण पावले. तसेच



चालक शेख साजिद शेख फरीद,कुनबा सय्यद आसिफ व १८ वर्ष, सय्यद अजब माज सय्यद असिफ वय २५ वर्ष यांना गंभीर दुखापत झाली. सदरील जखमींना उपचार कामी ग्रामीण रुग्णालय सिंदखेडराजा येथे व पुढील उपचार कमी जालना येथे पाठविण्यात आले. दोन्ही मृतक यांना ग्रामीण रुग्णालय सिंदखेडराजा येथे ॲम्बुलन्सने पाठविण्यात आले. अपघात ग्रस्त वाहन घटनास्थळावरून बाजूला घेऊन दुसरबीड टोल नाका येथे लावण्यात आले.वाहतूक सुरळीत सुरू आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८